निशाणी क्र.१४

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – शिवाजी दत्तू कोळनूरे,

वय – ४२ वर्षे व्यवसाय– शेती,

राहणार – रा.हरिजवळगा, ता.निलंगा, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. दि.२५.०३.२०२५ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्याकरीता मदनसूरी येथील विश्वकर्मा सराफ दुकाणात बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत राम येरनाळे, किरण पोतदार, गणेश पोतदार आणि पोलीस हे होते. पोलिसांनी दुकाणात चोरी झाल्याचे सांगीतले. त्या दुकाणाचे शटर उचकटलेले होते. सी.सी.टी.व्ही. ची वायर कापलेली होती. त्या दुकाणातील कपाटावरील व इतर ठिकाणावरील हाताचे उठलेले ठसे घेतले. त्या घटना ठिकाण पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला. (आता मला दि.२५.०३.२०२५ रोजीचा प्रस्तुत कामातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यावर राम येरनाळे आणि पोलीसाची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. तो पंचनामा माझ्यासमक्ष झालेला होता. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात आली आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. टी.आर.पाटील यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, गणेश हा माझा मित्र आहे. पंच व्हा असे सांगण्याकरीता पोलिस माझ्याकडे आले नव्हते. ठसे घ्यायचे म्हणूण मला बोलावले नव्हते. मी, गणेश आणि

राम येरणाळे एकाच गावातील आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मी, गणेश आणि राम येरणाळे मित्र आहोत. ठसे घेतल्यानंतर मी दुकाणात गेलो असे घडले नाही. घटणा ठिकाणच्य पुर्वेला मदनसुरी–लिंबाळा जाणारा रस्ता आहे. घटना ठिकाणच्या पंचनाम्यावर नकाशा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, गणेशच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष घटनाठिकाणचा पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर मी सही केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांच्याशी माझे चांगले संबंध असल्याने मी त्यांना मदत करण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण** **श्रवणोत्तर स्वीकृत,**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.24 12:02:38 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–१६/०२/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा